महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५३ /२०२३ दि. २८/०३/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी**, ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रभाग क्र. २२ मधील सिडको क्रिक रोड, शितला माता चौक, दादोजी कोंडदेव स्टेडियम येथील रस्ता खचून मलनि:सारण होल्स तुटल्याने त्याची पुर्नबांधणी करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **एस. एस. बुरसे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय २, ठाणे शहर, अतिरिक्त कार्यभार, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद** – १) छत्रपती शिवाजी महाराज चौक, कळवा कडून व साकेत रोडने सिडको बस स्टॉप कडे जाणाऱ्या TMT, NMMT व सर्व प्रकारच्या खाजगी बसेसना **क्रिक नाका** येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदर बसेस प्रवाशांना क्रिक नाका येथे सोडतील तसेच तेथूनच प्रवाशांना घेवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – २) छत्रपती शिवाजी महाराज चौक, कळवा कडून व साकेत रोडने सिडको बस स्टॉप कडे जाणाऱ्या दुचाकी, तीन चाकी व चार चाकी वाहनांना **शितलामाता चौक** येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने माता रमाबाई चौक येथून उजवे वळण घेवून दादोजी कोंडदेव स्टेडियम समोरून जवाहर बाग व ए–वन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – ३) सिडको बस स्टॉप कडून ए–वन फर्निचर कडे व मुख्य बाजारपेठ कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शितलामाता चौक** येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने शितलामाता चौक येथून डावे वळण घेवून राघोबा शंकर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – ४) ए–वन फर्निचर व राघोबा शंकर रोड कडून सिडको बस स्टॉप कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **माता रमाबाई चौक** येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने जवाहर बाग, अग्निशामक केंद्र येथून उजवे वळण घेवून राघोबा शंकर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना दि. २८/०३/२०२३ ते दि. ०४/०४/२०२३ पर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( एस. एस. बुरसे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय २, ठाणे शहर.
अतिरिक्त कार्यभार,
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
– आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

Scanned with CamScanner

– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
– ठाणे पोलीस पत्रक

प्रत :– नगर अभियंता, ठा. म. पा. ठाणे.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि ठाणेनगर वाहतूक उप विभाग.

Scanned with CamScanner